# ।। गोदावरी आरती ।।

**www.GodavariAarti.org**

---

### आरती गोदावरी । उगमस्थान ब्रह्मगिरी । कुशावर्ति नाथाचरणी । माता त्र्यंबकेश्वरी ।।१।। धृ०

पुण्यसलीला 'गोदामाई', 'श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर' येथे, 'ब्रह्मगिरी' पर्वतावर उगम पावते, पवित्र कुंड 'कुशावर्त' रूपाने 'संत श्री निवृत्तीनाथ महाराज' यांना चरणस्पर्श करते. ।।१।।

### उद्धारया गौतमा । महादेव जटाधारी । विनवी दक्षिणगंगा । प्रकटली गंगाद्वारी ।।२।।

एका आख्यायिकेनुसार, गोहत्यापतित 'मुनि श्री गौतम', यांच्या पापनिवारणार्थ कठोर तपस्येने प्रसन्न, 'श्री शंकर भगवान' ज्या खड़कावर आपल्या जटा आपटतात व गंगा माता जिथे प्रकट झाली तेच 'गंगाद्वार' होय, आणि तिच ही 'दक्षिणगंगा'! ।।२।।

### वर देई माता अंजनी । वंदी प्रभुरामभूमी । धन्य अमृतवाहिनी । कुंभमेळा तपांतरी ।।३।।

'अंजनीमाता' निवासक्षेत्र व 'रामभक्त श्री हनुमान' यांचे जन्मस्थान जो 'अंजनेरी' पर्वत, जणू काही माता गोदावरीला आशिष देत आहे, तर प्रभुश्रीरामचंद्रांच्या पदस्पर्शाने पावन भूमीला, माता गोदावरी जणू साष्टांग लोटांगणच घालत आहे. पुराणातील आख्यायिकेनुसार, 'सागरमंथना'तून प्राप्त रत्न - 'अमृतकुंभा'तील काही थेंब, धन्य माता गोदावरीच्या पात्रातील 'रामकुंड-श्रीक्षेत्र नाशिक' व 'कुशावर्त-श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर' येथे पडल्याने, त्या तीर्थक्षेत्रांत दर १२ वर्षांनी "सिंहस्थ कुंभमेळा" भरतो. ।।३।।

### पंचक्रोशी तारावया । गोवर्धन जनस्थानी । नाथसागरा पैठणी । स्थिरावली क्षणभरी ।।४।।

'श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर' येथून प्रवाहित माता गोदावरी मनोहर नागमोडी वळणं घेत-घेत, 'जनस्थान' अर्थात् 'श्रीक्षेत्र नाशिक' येथे 'गोवर्धन' अर्थात् 'गंगापुर' धरण आणि पुढे 'श्रीक्षेत्र पैठण' येथे 'नाथसागर' अर्थात् 'जायकवाडी' धरणामध्ये स्थिरावल्यामुळे सभोवतालचा परिसर सुजलाम्-सुफलाम् झाला आहे. ।।४।।

### जलदात्री गोदावरी । असे अग्नेय प्रवाही । जोडीशी पंचक्षेत्र । संगमा ती राजमुंद्री ।।५।।

जीवनवाहिनी-जलदेवता माता गोदावरीचा प्रवास सह्याद्रीच्या कुशीत पश्चिम घाटात १,०६७ मीटर उंचीवर सुरू होऊन, पुढे 'दख्खन'च्या पठारावरून साधारणत: अग्नेय दिशेने, 'महाराष्ट्र', 'तेलंगाना', 'आंध्रप्रदेश', 'छत्तीसगढ़' आणि 'ओड़िशा' या पाच राज्यांतून होत-होत, शेवटी आंध्रप्रदेशात 'राजमहेंद्री' (राजमुंद्री) येथे बंगालच्या उपसागरास संगम पावते. ।।५।।

### तुल्या वसिष्ठा गौतमी । कौशिकी आत्रेयी । भारद्वाजी वृद्धगौतमी । धारासप्त गोदावरी ।।६।।

"सप्तगोदावरी स्नात्वा नियतो नियताशन:। महापुण्यमप्राप्नोति देवलोके च गच्छति॥" नुसार पुराणात वर्णन केलेल्या, माता 'गोदावरी' च्या महापुण्यप्राप्तिकारक सप्त धारा - 'तुल्या', 'वसिष्ठा', 'गौतमी', 'कौशिकी', 'आत्रेयी', 'भारद्वाजी' आणि 'वृद्धगौतमी' या आहेत. ।।६।।

**#godavariaarti**

# “गोदावरी आरती” उपक्रम

**www.GodavariAarti.org**

## “गोदावरी आरती” उपक्रम काय आहे?

मानवशरीरात साधारणतः ७०% पाणी आहे. अन्नाशिवाय मानव तीस दिवसही जगू शकेल, परंतु पाण्याशिवाय तीन दिवसदेखील कठीण आहे. पाणी म्हणजे जीवन. आई जन्म देते, नदी जीवन देते. या अर्थाने आपल्यासाठी माता गोदावरी आईच आहे. “जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी”. जीवनदायी माता गोदावरीचे पावित्र्य जपण्यासाठी, तिचे संवर्धन करण्यासाठी प्रत्येकजण आपापल्यापरीने विविध स्तरावर प्रयत्न करत आहे. परंतु एवढ्यावरच भागणार नाही. माता गोदावरी आपली संस्कृति बनली पाहिजे. नळांद्वारे घराघरांत पोहोचलेली माता गोदावरी केवळ शरीरातच नाही, तर आपल्या मनात संचारली पाहिजे.

“प्रत्येक चांगल्या आणि नवीन विचाराचे संस्कृतीत रूपांतर व्हायला साधारणतः ३० वर्षे म्हणजेच एक पिढी इतका कालावधी लागतो.” चला तर मग, आपण सुजाण-जागरूक नागरिक या नात्याने, येणाऱ्या नवीन पिढीसाठी “माता गोदावरी” हा एक नवीन विचार पेरूयात. साहित्य, संगीत, तंत्रज्ञान आणि लोकसहभाग या माध्यमांतून आपण सर्व जण मिळून माता गोदावरीचा घराघरातून जागर करूयात, माता गोदावरीचे भौगोलिक, पौराणिक, सांस्कृतिक, तसेच व्यावहारिक महत्त्व गाऊयांत, माता गोदावरीची मनोभावे शब्दसंगीत-पूजा करूयांत, नित्य-आरती करूयांत, “गोदावरी आरती” या उपक्रमांत कर्तव्यबुद्धीने सहभागी होऊयांत.

## “गोदावरी आरती” उपक्रमात कोणास सहभागी होता येईल?

“गोदावरी आरती” उपक्रमात खाजगी तसेच सरकारी संस्था, शाळा, संगीत/कला-प्रशिक्षण-संस्था, विद्यार्थी, शिक्षक, पालक, गायक, वादक, नर्तक, चित्रकार व अन्य व्यावसायिक कलावंत अर्थातच प्रत्येक नागरिकांस आपल्या कला सादरीकरणासह सहभाग घेता येईल.

## “गोदावरी आरती” उपक्रमात कसे सहभागी होता येईल?

“गोदावरी आरती” उपक्रमात सहभागी होण्यासाठी आपल्या आवाज (vocal) किंवा वाद्य (instrumental) स्वरूपात, व्यक्तिगत (individual), युगल (duet) किंवा सामूहिक (group) पद्धतीने “गोदावरी आरती” रेकॉर्ड करावी. त्यासाठी, **www.godavariaarti.org** संकेतस्थळाला भेट द्या व खालीलप्रमाणे कृती करा.

१. **ऐका [Listen]**:- संकेतस्थळावर काही गायक आणि वादक यांनी नमुनादाखल सादर केलेल्या गोदावरी आरत्या ऐका.

२. **सराव करा [Practice]**:- संकेतस्थळावर दिलेल्या “गोदावरी आरती” karaoke संगीत ट्रॅक सोबत सराव करा.

३. **रेकॉर्ड करा [Record]**:- आपल्या सोईनुसार ऑनलाईन / ऑफलाईन ऑडिओ / व्हिडीओ पर्याय निवडून रेकॉर्ड करा.

४. **शेअर करा [Share]**:- रेकॉर्डेड गोदावरी आरती सोशिअल मेडियावर **#godavariaarti** हा हॅशटॅग देऊन शेअर करा.

५. **प्रमाणपत्र मिळवा [Get Certificate]**:- सहभाग प्रमाणपत्र मिळविण्यासाठी संकेतस्थळावर अर्ज करा.

“गोदावरी आरती” उपक्रमांतर्गत किमान १ लक्ष आरती गायन/वादनाचे उद्दिष्ट आहे. कृपया, यात आपण सक्रिय सहभागी व्हावे आणि “गोदावरी आरती” हा अभिनव उपक्रम अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचवून योगदान करावे अशी नम्र विनंती. धन्यवाद!

**#godavariaarti**